दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
वर्ष-४
अंक - ४०
epaper.diwanews.com
www.diwanews.com ♦ सोमवार,५ मे २०२५ ♦ पाने-८ ♦ संपादक-सुहास खंडागळे ♦ किमंत-४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669

## रमाकांत मढवी विशेष

**२०१७ नंतर** *दिवा शहरात ठाणे शहराप्रमाणेच अंतर्गत सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते होऊ लागले. आज दिव्यातील जवळपास सर्वच अंतर्गत रस्ते गल्ल्या या सिमेंट कॉंक्रीटच्या झालेल्या पाहायला मिळतात...*

(पान ३ वर)

१ मे

## बदलत्या दिवा शहराचे
# शिल्पकार



### दिवा विकासाची दूरदृष्टी
दिवा शहराच्या विकासाची दूरदृष्टी ठेवून 2017 पासूनच रमाकांत मढवी यांनी शहराच्या सर्वांगीण विकासाची पायाभरणी करण्यात सुरुवात केली.

### विकासाची पायाभरणी
शहराच्या विकासाचे व्हिजन 24 तास डोक्यात बाळगणारे अभ्यासू नेतृत्व म्हणून मढवी यांची वाटचाल आहे. त्यांनी 2017 ते 2024 या कालावधीत दिवा शहरातील पायाभूत सुविधांसाठी पालिका व शासन दरबारी पाठपुरावा करून मोठ्या प्रमाणात विकास निधी आणला.

### संघटन कौशल्य
रमाकांत मढवी यांच्या संघटन कौशल्याने शहरातील सर्वच राजकीय पक्षांच्या विरोधकांना जेरीस आणले आहे. एक हाती शिवसेनेचा दरारा त्यांनी दिवा शहरात निर्माण केला असून पक्षावरही मढवी यांचे वर्चस्व पाहायला मिळते.





# सामान्य दिवेकरांच्या घरासाठी पाठपुरावा करणारे नेतृत्व



# दिवावासीयांच्या हक्काच्या अधिकृत घरासाठी क्लस्टर योजना!

दिवा शहरातील नागरिकांना ठाणे शहरातील नागरिकांप्रमाणेच नागरी सुविधा मिळाव्यात, आपलं हक्काचं अधिकृत घर मिळावं या दृष्टीने रमाकांत मढवी यांनी मागील पाच वर्षांपासून पालिका प्रशासनाकडे पाठपुरावा करून दिव्यासाठी ही क्लस्टर योजना मंजूर करून घेतली

दिवा शहरात क्लस्टर योजना होण्याच्या दृष्टीने येथील इमारतींचं तातडीने सर्वेक्षण व्हावं या दृष्टीने महापालिकेने अर्थसंकल्पात त्यासाठीची विशेष तरतूद केली.

खासदार श्रीकांत शिंदे यांच्या पुढाकाराने दिवा शहरातील क्लस्टर योजना लवकरात लवकर मार्गी लागण्याच्या दृष्टीने प्रयत्न झाले आणि मागील जानेवारीत दिवा शहरात प्रत्यक्ष क्लस्टर योजनेच्या सर्वेक्षणास सुरुवात झाली.

शहरातील नागरिकांना त्यांच्या अनधिकृत घराच्या मोबदल्यात अधिकृत हक्काचे घर मिळणार असल्याने नागरिकांनीही या योजनेचा स्वागत केलं. समाधान व्यक्त केलं.

या योजनेअंतर्गत शहरात नागरिकांना चांगले रस्ते, गार्डन, खेळाची मैदान व सुसज्ज घर मिळणार असल्याने नागरिक या योजनेचे स्वागत करत आहेत.

दिवा शहरातील सर्वसामान्य नागरिकांना जुन्या अनधिकृत घरांमध्ये जीव मुठीत घेऊन राहण्यापेक्षा त्यांना क्लस्टर योजनेच्या माध्यमातून अधिकृत आणि दीर्घकाल टिकणारी घरे उपलब्ध करून दिल्यास येथील नागरिकांचे जीवन उंचावेल हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून, नोकरदार वर्ग असणाऱ्या या शहरातील सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्याचे काम रमाकांत मढवी यांनी क्लस्टर योजना दिव्यात आणून केले.

क्लस्टर योजनेचे वैशिष्ट्य असे की, आज दिवा शहरात जे बकाल स्वरूप दिसते..ते क्लस्टर योजना झाल्यानंतर दिवा शहराचे स्वरूप अतिशय नियोजन पद्धतीने झालेले आपल्याला दिसेल. शहराच्या विकासाचे व्हिजन ठेवून रमाकांत मढवी वाटचाल करत असतात म्हणूनच त्यांना दिवा शहराचे नेते म्हणून लोक मान्यता आज प्राप्त झाली.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिध्दकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा.लि.प्लॉट क्र.डब्लू २३०,टीटीसी खैरणे,नवी मुंबई-४००७१०येथे छापून,श्रीकृपा बिल्डींग, ए विंग,पहिला माळा,फ्लॅट क्रमांक १०१,सेंट मेरी शाळेजवळ,दिवा(पूर्व) ठाणे -६१२ ता/जि-ठाणे,राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले.संपर्क-८०८०९७७९५५
संपादक -सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669

९ मे

> २०१७ नंतर दिवा शहरात ठाणे शहराप्रमाणेच अंतर्गत सिमेंट काँक्रीटचे रस्ते होऊ लागले.आज दिव्यातील जवळपास सर्वच अंतर्गत रस्ते गल्ल्या या सिमेंट काँक्रीटच्या झालेल्या पाहायला मिळतात.

> एकंदरीत रमाकांत मढवी यांनी त्यांच्या अलीकडच्या कारकिर्दीमध्ये दिव्याचा चेहरा मोहरा बदलण्यासाठी घेतलेले अथक परिश्रम दुर्लक्षित करता येणार नाहीत.

> एकीकडे सत्तेच्या माध्यमातून दिवा शहराचा चेहरा मोहरा बदलण्यात मढवी यांचा सिंहाचा वाटा असताना दुसरीकडे दिव्यातील विरोधकांना नामोहरम करण्यात देखील मढवी यांनी कोणतीही कमी सोडलेली नाही.





# बदलत्या दिवा शहराचे शिल्पकार!

एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री झाल्यानंतर दिव्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध व्हावा यासाठी मढवी यांचा आग्रह लपून राहिलेला नाही. एकनाथ शिंदे यांनी सुद्धा मढवी यांच्या पाठपुराव्याला प्रतिसाद देत दिव्यासाठी भरघोस निधी दिला.अनेक जाहीर कार्यक्रमात शिंदे यांनी मढवी यांच्या दिव्यासाठीच्या भूमिकेचे कौतुक केले. शहरांमध्ये अनेक विकास काम मागील सहा सात वर्षांमध्ये झाली. एकीकडे विकास काम होत असताना क्लस्टर सारखी योजना देखील दिव्यात राबवण्याची घोषणा झाली. त्या दृष्टीने सर्वेक्षण झालं. दिवा शहरातील कोणताही प्रश्न असो तो प्रश्न रमाकांत मढवी यांनी पालिका किंवा शासन दरबारी मांडल्यानंतर त्याला प्रतिसाद मिळाला नाही,

दिवा:-रमाकांत मढवी हे उपमहापौर झाल्यानंतर दिव्याच्या राजकारणात त्यांनी आपली पकड मजबूत केली. प्रशासन ते पक्ष संघटना यात वर्चस्व ठेवण्यात ते यशस्वी राहिले. दिवा शहराच्या विकासासाठी २०१७ पासूनच प्रयत्नशील असणारे मढवी यांना शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे यांचे मिळालेले पाठबळ यामुळे सुरुवातीपासूनच येथील पायाभूत सुविधांच्या पूर्ततेसाठी महापालिका प्रशासन व शासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला.याचा एकंदरीत परिणाम २०१७ च्या आधीचा दिवा आणि २०१७ नंतरचा दिवा यात आपल्याला दिसू लागला, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. २०१७ नंतर दिवा शहरात ठाणे शहराप्रमाणेच अंतर्गत सिमेंट काँक्रीटचे रस्ते होऊ लागले.आज दिव्यातील जवळपास सर्वच अंतर्गत रस्ते गल्ल्या या सिमेंट काँक्रीटच्या झालेल्या पाहायला मिळतात. यासाठी भरघोस निधीची तरतूद करण्यासाठीची धावपळ मढवी यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसोबत केली ही वस्तुस्थिती आहे. दिव्यातून अनेक समस्या व प्रश्नाबाबत वारंवार उठविण्यात येणारा आवाज लक्षात घेऊन मढवी यांनी कामाचं स्पीड वाढवलं. विरोधकांना कामातून उत्तर देण्याकडे त्यांचा कल राहिला आहे. आजही ते विकास कामांकडे अधिक लक्ष देताना दिसतात. प्रशासकीय मंजूऱ्या जलद गतीने मिळवण्यात त्यांना यश आलं आहे. याचा एकंदरीत परिणाम येथील काही पायाभूत प्रश्न निकालात निघण्यात यश आलेलं दिसतं. दिवा शहरातील मुख्य रस्ते आज बदललेले पाहायला मिळतात.दिवा शीळ रस्त्याचं चौपदरीकरण सध्या सुरु आहे.एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री झाल्यानंतर दिव्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध व्हावा यासाठी मढवी यांचा आग्रह लपून राहिलेला नाही. एकनाथ शिंदे यांनी सुद्धा मढवी यांच्या पाठपुराव्याला प्रतिसाद देत दिव्यासाठी भरघोस निधी दिला.अनेक जाहीर कार्यक्रमात शिंदे यांनी मढवी यांच्या दिव्यासाठीच्या भूमिकेचे कौतुक केले. शहरांमध्ये अनेक विकास काम मागील सहा सात वर्षांमध्ये झाली. एकीकडे विकास काम होत असताना क्लस्टर सारखी योजना देखील दिव्यात राबवण्याची घोषणा झाली. त्या दृष्टीने सर्वेक्षण झालं. दिवा शहरातील कोणताही प्रश्न असो तो प्रश्न रमाकांत मढवी यांनी पालिका किंवा शासन दरबारी मांडल्यानंतर त्याला प्रतिसाद मिळाला नाही, असं झालं नाही. एकंदरीत रमाकांत मढवी यांनी त्यांच्या अलीकडच्या कारकिर्दीमध्ये दिव्याचा चेहरा मोहरा बदलण्यासाठी घेतलेले अथक परिश्रम दुर्लक्षित करता येणार नाहीत. मागील सहा सात वर्षांमध्ये झालेली एकंदरीत विकास कामे ही दिव्याचा कायापालट करणारी आहेत.अनेक भागात पाणी प्रश्न सुटला आहे. पाणी प्रश्न सोडवण्यात पालिका प्रशासनाला यश आले आहे. आजही काही भागात पाणी प्रश्न प्रलंबित आहे.त्याला अंतर्गत जलवाहिन्या नसणे हे कारण आहे.परंतु दुसरीकडे पूर्वी तीव्र पाणीटंचाई असणाऱ्या भागांमध्ये पुरेसे पाणी पोहोचवण्यात पालिका प्रशासनाला यश आल आहे.पाणी प्रश्न कायमचा सोडवण्यासाठीची मढवी यांची तळमळ नागरिकांना दिसते.वाढते दिवा शहर लक्षात घेऊन सर्वांनाच पुरेसं पाणी मिळावं यासाठी त्यांचा आग्रह नागरिकांच्याही लक्षात येतो.सकाळीच रमकांत मढवी यांच्या घरी अनेक समस्या प्रश्न घेऊन येणारे नागरिक हे मढवी यांच्याकडून लोकांची काम होत असल्याचे उदाहरण आहे.रमाकांत मढवी यांच्याकडे गेल्यानंतर प्रश्न सुटतात अशी भावना लोकांची आहे.दिवा शहरातील आरोग्याचा प्रश्न सोडवताना साबे,दातिवली या भागात आरोग्य केंद्र सुरू करण्यात आली.गणेश नगर येथेही आरोग्य केंद्र सुरू झालं.आपला दवाखाना दिवा शहरात अनेक भागांमध्ये सुरू करण्यात आले.यातून नागरिकांना आरोग्य सुविधा पुरवली जात आहे. दिवा शहरासाठी मंजूर असणारे सुसज्ज हॉस्पिटल, पोलीस ठाणे, प्रभाग समिती कार्यालय, अग्निशमन केंद्र लवकरात लवकर व्हावे यासाठी मढवी यांचा पाठपुरावा सुरू आहे. दिवा शहरातील नागरिक हे रेल्वेने प्रवास करतात. परिणामी रेल्वे विषयक सुधारणांसाठी खासदारांकडे पाठपुरावा आणि त्याची अंमलबजावणी या दोन्ही गोष्टींसाठी रमाकांत मढवी धावपळ करताना दिसतात. दिवा शहरातून सुरू असणाऱ्या बस सेवेसाठी देखील ते कायमच आग्रही राहिलेले आहेत. एकीकडे सत्तेच्या माध्यमातून दिवा शहराचा चेहरा मोहरा बदलण्यात मढवी यांचा सिंहाचा वाटा असताना दुसरीकडे दिव्यातील विरोधकांना नामोहरम करण्यात देखील मढवी यांनी कोणतीही कमी सोडलेली नाही. त्यांच्याकडे उत्तम संघटना कौशल्य आहे. आज दिवा शहरातील राजकारणात महत्त्वाचे नेते म्हणून ओळख मढवी यांनी निर्माण केली आहे.मनसे,भारतीय जनता पार्टी असो अथवा ठाकरेंची शिवसेना असो,या दोन्ही विरोधी पक्षांना जेरीस आणण्याचे काम मढवी मागील काही वर्षांपासून करत आहेत.रमाकांत मढवी हे कायमच विरोधकांच्या दोन पावल पुढे राहिले असून मढवी यांना घेरण्याची एकही संधी विरोधकांना मिळत नाही हे रमाकांत मढवी यांच्या कार्यप्रणालीचं वैशिष्ट्य आहे.राजकारणात विरोधकांशी सौजन्याने वागताना विरोधकांचा प्रभाव आपल्या भागात वाढणार नाही, याची काळजी २०१७ पासूनच रमाकांत मढवी यांनी घेतली आहे. याचाच परिणाम आज एक हाती सत्ता दिवा शहरावर शिवसेनेची असल्याची पाहायला मिळते.मढवी यांनी टाकलेले डावपेच आणि आखलेली राजकीय रणनीती यातूनच शिवसेनेचा बालेकिल्ला म्हणून दिवा शहराची ओळख निर्माण झाली आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत दिवा शहरातून शिवसेनेला सर्वाधिक मतं मिळाली.येथील मतदार आपल्या सोबत ठेवण्यात रमाकांत मढवी यांना यश आल आहे.त्यांच्या या संघटन कौशल्यामुळेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विशेष प्रेम मढवी यांच्यावर आहे.शहराच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन मढवी यांनी दिवा शहराच्या विकासाचे स्वप्न उराशी बाळगल आहे. महापालिका, राज्य सरकार यांच्या माध्यमातून शहरातील विविध विकास कामे कशी मार्गी लागतील याचा दृष्टिकोन बाळगणारे मढवी हे बदलत्या दिव्याचे शिल्पकार आहेत असं म्हटलं तरी वावगं ठरणार नाही. दिवा शहराच्या विकासाचे स्वप्न त्यांनी पाहिले आहे.ते स्वप्न पूर्ण होण्यासाठी ईश्वर त्यांना उत्तम आरोग्य देवो आणि दिवा शहराच्या विकासाचा आवाज बुलंद राहो,ही त्यांना वाढदिवशी शुभेच्छा!

**- टीम दिवा न्यूज**




दिवा शहरातील
समस्या सोडवण्यासाठी शासन
स्तरावर पाठपुरावा करणारे
माजी उपमहापौर,
शिवसेना दिवा शहर प्रमुख
श्री.रमाकांत
मढवी साहेब
यांस वाढदिवसाच्या
खूप खूप शुभेच्छा!
९ मे
विकासाची दूरदृष्टी
असणारे नेतृत्व
शुभेच्छुक:- गणेश पाटील
समाजसेवक


दिवा शहराच्या
विकासासाठी
प्रयत्नशील असणारे
माजी उपमहापौर,
शिवसेना दिवा शहर प्रमुख
श्री.रमाकांत
मढवी साहेब
यांस वाढदिवसाच्या
खूप खूप शुभेच्छा!
१ मे
विकासाची दूरदृष्टी
असणारे नेतृत्व
शुभेच्छुक:- कैलास भगत
समाजसेवक

# जातनिहाय जनगणनेमुळे सामाजिक न्यायाचे महाद्वार उघडेल

## राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून ऐतिहासिक निर्णयाचे स्वागत

**ठाणे :-** जातनिहाय जनगणनेमुळे देशात सामाजिक न्यायाचे महाद्वार उघडेल, अशा शब्दांत शिवसेनेचे मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केंद्र सरकारच्या ऐतिहासिक निर्णयाचे स्वागत केले. परमपूज्य महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेला भारतीय समाज आता भविष्यात उभा राहिलेला दिसेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ठाणे येथे बुधवारी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच देशात जातनिहाय जनगणना करण्याचं धाडस पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी दाखवलं. या निर्णयाचे शिवसेना पक्ष समर्थन करतो आणि सरकारला पूर्ण पाठिंबा असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले. जातनिहाय जनगणनेतून समोर येणाऱ्या आकडेवारीमुळे कल्याणकारी लोकाभिमुख योजना प्रभावीपणे राबवता येतील. घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वप्नातील सामाजिक आणि समतेची संकल्पना प्रत्यक्षात येईल. संविधानानुसार समाजातील शेवटच्या घटकापर्यंत न्याय पोहोचेल, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, असे कठोर, धाडसी, लोकाभिमुख, जनहिताचे निर्णय घ्यायला धाडस लागतं आणि पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी त्यांच्या कृतीतून वारंवार दाखवून दिले आहे, असे कौतुकोद्गार उपमुख्यमंत्री शिंदे यांनी काढले. महाराष्ट्र दिनाच्या पूर्वसंध्येला सामाजिक न्यायाची भेट केवळ महाराष्ट्रालाच नाही तर संपूर्ण देशाला मिळाली, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले. सामाजिक न्याय, समता आणि देशाच्या भविष्याशी निगडित हा निर्णय आहे, असे ते म्हणाले.

ते पुढे म्हणाले की, जातनिहाय जनगणनेची अनेक वर्षांची मागणी होती, मात्र यापूर्वी अनेक वर्ष सत्तेत असणाऱ्या काँग्रेसने केवळ आश्वासने दिली. प्रत्येक जातीकडे आणि समाजाकडे व्होटबँक म्हणून पाहिले, त्यामुळे ते निर्णय घेऊ शकले नाहीत, अशी टीका उपमुख्यमंत्री शिंदे यांनी काँग्रेसवर केली. 'संविधान बचाव'च्या ऊठसूट बाता मारणाऱ्या काँग्रेसची अवस्था मात्र आता 'सहन होत नाही, आणि सांगताही येत नाही' अशी झालीय. हातात कोरी लाल वही दाखवून 'संविधान बचाव'च्या आरोळ्या ठोकणं सोपं आहे, पण कठोर निर्णय घ्यायला मोदीजी कधीच मागे हटले नाहीत, याचा हा ताजा पुरावा मिळालाय. परमपूज्य महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेला भारतीय समाज आता भविष्यात उभा राहिलेला दिसेल. जातनिहाय जनगणनेमुळे 'दूध का दूध, पानी का पानी' होईल, आणि या देशाचं वस्त्र नेमकं कुठल्या धाग्यांनी विणलं गेलं आहे, हे स्पष्टपणे कळून येईल. असे निर्णय घ्यायला धाडस लागतं. पण मोदीजींनी मात्र निवडणुका, मतदान वगैरे पर्वा न करता सामाजिक न्यायासाठी कठोर निर्णयांचा धडाका लावला. ३७० कलम, नारी शक्ती वंदन, वक्फ बोर्ड सुधारणा कायद्या पाठोपाठ आज कास्ट सेन्ससचा निर्णय झाला, असे ते म्हणाले.



स्वातंत्र्यानंतर देशात पहिल्यांदाच पंतप्रधान नरेंद्र मोदीजींनी धाडस दाखवलं
व्होटबँकेचे राजकारण करणाऱ्या काँग्रेसवर सडकून टीका






# उत्तरप्रदेशात जाऊन ठाणे पोलिसांनी उध्दवस्त केला एमडी या अंमली पदार्थाचा कारखाना

## आंतरराज्यीय टोळीतील तिघे जेरबंद;सव्वा दोन कोटींहून अधिकाचा मुद्देमाल जप्त



## ठाणे अंमली पदार्थ विरोधी पथकाची कामगिरी

**ठाणे:-** मुंब्र्यात पकडलेल्या एमडी या अंमली पदार्थांचे कनेक्शन उत्तरप्रदेश आढळून आले. ठाणे शहर पोलिसांनी थेट उत्तर प्रदेश गाठून तेथील पोलिसांच्या मदतीने एम.डी. या अंमली पदार्थाची निर्मितीचा कारखाना उद्ध्वस्त केला. तसेच हा कारखाना चालविण्प्रया टोळीचा पर्दाफाश करत उत्तरप्रदेश मधील देवेश कुमार रामकिशन शर्मा (३२) ,मोहम्मद कय्युम मोहम्मद युनुस हाशमी (४५) या दोघांसह गुजरात येथील बिपीन बाबूलाल पटेल (४९) या त्रिकुटाला अटक केली. तसेच त्यांच्याकडून एकूण २ कोटी ३० लाख ४९ हजार ६०० रुपये किंमतीचा १ किलो १४८ ग्रॅम वजनाचा एमडी जप्त केला आहे. पटेल याचे शिक्षण एमएससी ( केमिस्ट्री) मधून झाले असून तो एमडी हा अंमली पदार्थ बनविण्यात पारंगत आहे. तसेच तो मध्यप्रदेश येथील एका गुन्ह्यात पाहिजे असलेला आरोपी असल्याची माहिती ठाणे गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त अमरसिंह जाधव यांनी पत्रकार परिषदेत दिली. मुंब्रा रेल्वे स्टेशन जवळ एक जण एमडी पावडर विक्रीसाठी येणार असल्याची माहिती गुन्हे शाखेचे पोलीस हवालदार अमोल देसाई आणि पोलीस शिपाई प्रमोद जमदाडे यांना १७ एप्रिल रोजी मिळाली होती. त्यानुसार सापळा लावून देवेश शर्मा याला अटक करून त्यांच्याकडून ३३६ ग्रॅम वजनाचा एमडी जप्त केला होता. त्याची किंमत ६७ लाख २० हजार रुपये आहे. याप्रकरणी मुंब्रा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्यावर चौकशीत देवेश याने त्याला हा माल उत्तरप्रदेश मधील कय्युम दिल्याचे सांगितले. याचदरम्यान अंमली पदार्थ विरोध पथकाने सहायक पोलिस निरीक्षक निलेश मोरे यांनी केलेल्या तांत्रिक विश्लेषणाचे साहाय्याने कय्युमचे नाव मोहम्मद कय्युम मोहम्मद युनुस हाशमी असे असून तो सोहवल जिल्हा आयोध्या येथे राहणार असल्याचे स्पष्ट झाले. तसेच त्याचे मारिया किड्स एन्ड लेडीज वेअर नावाचे कपड्याचे दुकान असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर ठाणे पोलिसांनी वेशांतर करून पाच दिवस त्या परिसरात राहून पाहणी केली. याचदरम्यान त्याच्या दुकानाच्या पाठीमागील गाळ्यामध्ये एमडी हा पदार्थ तयार करण्याचा कारखाना असल्याचे खात्री झाल्यानंतर ठाणे शहर पोलिसांनी उत्तरप्रदेश लखनऊ येथील स्पेशल टास्क फोर्स यांच्या संयुक्त विद्यमाने २७ एप्रिल २०२५ रोजी दुकानावर छापा टाकत मोहम्मद हाश्मी याला अटक केली. तसेच त्याचा साथीदार बिपिन पटेल यालाही एमडी या पदार्थाची निर्मिती करताना अटक केली. याकरवाईत एकूण १ कोटी ६२ लाख ४० हजार रुपये किमतीचा ८१२ ग्रॅम एमडी पावडर तसेच एमडी हे अंमली पदार्थ बनवण्याकरता लागणारे साहित्य व केमिकल जप्त करण्यात आले. मोहम्मद हाश्मी याच्यावर यापूर्वी उत्तर प्रदेशमध्ये दोन तर एक गुन्हा मीरा-भाईंदर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत दाखल आहे तसेच बिपीन पटेल याच्याविरोधात गुजरात मध्ये गुन्हा दाखल असून तो मध्य प्रदेश मधील डिपार्टमेंट ऑफ रेव्ह्यू इंटेलिजन्स इंदोर झोन युनिटच्या गुन्ह्यात पाहिजे असलेला आरोपी आहे. मोहम्मद आणि बिपिन या दोघांना येत्या ३ मे पर्यंत पोलीस कोठडी मिळाली असून देवेन हा न्यायालयीन कोठडीत असल्याची माहिती पोलिसांनी दिले. ही कारवाई अंमली पदार्थ विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल मस्के यांच्या पथकाने केली आहे.







दिवा शहरातील
लोकप्रिय नेते, शहराच्या
विकासासाठी प्रयत्नशील असणारे
माजी उपमहापौर,
शिवसेना दिवा शहर प्रमुख
श्री.रमाकांत
मढवी साहेब
यांस वाढदिवसाच्या
खूप खूप शुभेच्छा!
१मे
विकासाची दूरदृष्टी
असणारे नेतृत्व
शुभेच्छुक:- संजय भगत
समाजसेवक